(इंग्रजीत टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९६१] १ एस. सी. आर. ८८४

सर्वोच्च न्यायालय अहवाल

पदम सेन आणि अन्य एक

वि.

उत्तर प्रदेश राज्य

[न्या. जाफर इमाम , न्या. ए. के. सरकार आणि न्या. रघुबर दयाल]

आयुक्त- लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी नियुक्ती- ची वैधता--दिवाणी न्यायालयाची अंगभूत शक्ति —दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५), कलम ७५, १५१ , आ. २६.

लोक सेवक- अधिकारितेशिवाय दिवाणी न्यायालयाने नियुक्त केलेले आयुक्त - लोकसेवकाचे स्थान प्रत्यक्षात धारण करत आहे का? —भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५), कलम २१, स्पष्टीकरण २.

मुन्सिफने एका आर नावाच्या व्यक्तीची आयुक्त म्हणून नेमणूक केली. आर ने लेखापुस्तके जप्त केली आणि ती अद्याप त्याच्या ताब्यात असताना अपीलकर्त्यांनी त्यांच्यात अनधिकृत फेरफार करण्यास परवानगी दिल्याबद्दल आर यांना लाच देऊ केली. अपीलकर्त्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १६५-अ अन्वये न्यायचौकशी करण्यात आली आणि त्यांना दोषी ठरवण्यात आले. लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्त नेमण्याचा मुन्सिफला अधिकारिता नाही, आणि आयुक्त म्हणून

आर ची नेमणूक रद्दबातल ठरली आणि परिणामी आर हा लोकसेवक नाही आणि अपीलकर्त्यांनी त्याला लाच देऊ करून कोणताही गुन्हा केला नाही, असा युक्तिवाद अपीलकर्त्यांनी केला. उत्तरवादिनी उद्युक्त केले की, मुन्सिफ यांना दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ अन्वये असलेल्या अंगभूत शक्तीं अन्वये आयुक्तांची नेमणूक करण्याची अधिकारिता आहे आणि कोणत्याही परिस्थितीत भारतीय दंड संहितेच्या कलम २१ चे स्पष्टीकरण २ च्या मर्यादेत आर लोकसेवकाचे प्रत्यक्ष स्थान धरण करीत होता आणि म्हणून तो लोकसेवक समजला जाईल.

असा निर्णय देण्यात आला की, आर हा लोकसेवक नव्हता आणि अपीलकर्त्यांनी दंड संहितेच्या कलम १६५-अ अन्वये लाच देऊ करून कोणताही गुन्हा केला नाही.

लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्त नेमण्याचा मुन्सिफ यांना अंगभूत शक्ति नव्हती आणि त्यांचा आदेश रद्दबातल होता. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ अन्वये अंगभूत शक्ति अश्या होत्या की, न्यायालयाने कारण ठरवताना त्याआधी कोणत्या प्रक्रियेचा अवलंब करावा ; असे अधिकार पक्षकारांच्या मूलभूत अधिकारांच्या पलीकडे जात नाहीत. त्यांच्या लेखा पुस्तकांवर पक्षकाराला पूर्ण अधिकार होता आणि त्याची मालमत्ता बळजबरीने जप्त करण्याची कोणतीही अंगभूत शक्ती न्यायालयाला नव्हती.

भारतीय दंड संहितेच्या कलम २१ चे स्पष्टीकरण २ केवळ लोकसेवकाचे स्थान पूर्वीपासून प्रत्यक्ष धारण करत असलेल्या व्यक्तीलाच लागू होते. सध्याच्या प्रकरणात असे कोणतेही आयुक्ताचे स्थान किंवा पद अस्तित्वात नव्हते की जे आर ने धारण केले होते. त्यांची नेमणूक अधिकारिते शिवाय असल्याने आर ला लोकसेवक मानले जाऊ शकत नाही.

फौजदारी अपील अधिकारिता : फौजदारी अपील क्रमांक १४९/१९५८.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे फौजदारी अपील क्र. ११५४/१९५६ मधील न्यायनिर्णय आणि आदेश दिनांक २७ ऑक्टोबर, १९५८ मधून उद्भवलेले अपील.

एन. सी. चॅटर्जी आणि आर. एल. कोहली, अपील आपिलर्त्यांनाकरिता.

जी. सी. माथुर आणि सी. पी. लाल, उत्तरवादींन करिता.

१९६०, सप्टेंबर २७. न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. रघुबर दयाळ यांच्याद्वारे देण्यात आला.

हे अपील पदम सेन आणि शेखर चंद यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाचा आदेश, ज्याद्वारे त्यांचे मेरठचे विशेष न्यायाधीश यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १६५ अ अन्वये गुन्ह्यात त्यांना दोषी ठरविण्याच्या आदेशा विरुद्ध दाखल केलेले अपील फेटाळन्यात आल्याच्या विरोधात दाखल केले आहे. उच्च न्यायालयाने त्यानच्या आदेशाच्या विरोधात अपिलाला परवानगी मंजूर केली.

अपीलकर्ता क्रमांक २ शेखर चंद यांचे वडील गेंदा मल यांनी मिथन लाल आणि इतरां विरुद्ध गाझियाबाद येथील अतिरिक्त मुन्सिफच्या न्यायालयात प्रतिवादींनी त्यांच्या बाजून निष्पादीत केलेल्या वचनचिठ्ठीच्या आधारे पैशांसाठी दावा दाखल केला. प्रतिवादींनी केलेल्या प्रदाना संदर्भात वादी खोटी लेखा पुस्तके तयार करतील या भीतीने प्रतिवादींनी वादींची लेखा पुस्तके जप्त करण्याची मागणी केली. अतिरिक्त मुन्सिफ यांनी त्यांच्या २७ मार्च १९५४ च्या आदेशान्वये ती लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्त श्री रघुबीर परशाद, वकील यांची नेमणूक केली. त्यानुसार आयुक्तांनी ती पुस्तके जप्त करून गाझियाबादला आणली. .

त्या लेखा पुस्तकांमध्ये अनधिकृत फेरफार करण्याची संधी दिल्याबद्दल आयुक्तांना लाच देऊ केल्या प्रकरणी विशेष न्यायाधीशांनी अपीलकर्त्यांना भारतीय दंड संहितेच्या कलम १६५-अ अन्वये दोषी ठरविले होते. त्यांची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम ठेवली.

दोन कनिष्ट न्यायालयांना असे आढळले आहे की, अपीलकर्ते ३० मार्च १९५४ रोजी आयुक्त कार्यालयात जाऊन त्यांना ९०० रुपयांची लाच देऊ केली. अपीलकर्ते कनिष्ट न्यायालयांनी नोंदवलेल्या वस्तुस्थितीच्या या निष्कर्षांना आव्हान देत नाहीत. त्यांचा एकच युक्तिवाद आहे की आयुक्त श्री. रघुबीर परशाद हे लोकसेवक नव्हते आणि म्हणूनच खालील न्यायालयांनी दिलेल्या निष्कर्षांच्या आधारे त्यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १६५ अ अन्वये कोणताही गुन्हा केलेला नाही.

अपीलकर्त्यासाठी असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, प्रतिवादींच्या अर्जावर वादींची लेखा पुस्तके जप्त करण्याच्या हेतूने आयुक्त नेमण्याचा अधिकार अतिरिक्त मुन्सिफ यांना नव्हता, आणि म्हणून श्री. रघुबीर परशाद यांची आयुक्त म्हणून केलेली नियुक्ती रद्दबातल आहे, कारण दिवाणी न्यायालयाला दिवाणी प्रक्रिया संहितेच्या (यापुढे संहिता म्हणून संबोधित) कलम ७५ आणि आदेश २६ मधील तरतुदींद्वारे मर्यादित आयोगपत्र जारी करण्याचा अधिकार होता. राज्याच्या वतीने असे उद्युक्त करण्यात येते की, न्यायालय संहितेच्या कलम १५१ च्या व्यतिरिक्त त्याच्या अंगभूत शक्तींच्या वापर करून संहितेच्या कलम ७५ आणि आदेश २६ च्या तरतुदींमध्ये येत नसलेल्या उद्देशांसाठी आयुक्त नियुक्त करू शकते.

सरकारसाठी पुढे असे सादर करण्यात येते आहे की, जरी अतिरिक्त मुन्सिफ यांना लेखाची पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक करण्याचा अधिकार नव्हता, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ चे स्पष्टीकरण २ अन्वये श्री. रघुबीर परशाद यांना लोक सेवक मानले जाईल, कारण त्यांनी ज्यासाठी आयुक्त म्हणून कार्य केले त्या लोकसेवकाचे स्थान ते प्रत्यक्ष धारण करत होते आणि अशा प्रकारे दिवाणी दाव्याशी संबंधित अपीलयार्थी आणि इतरांकडून मान्य केले होते.

संहितेचे कलम ७५ न्यायालयाला कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्यासाठी, स्थानिक चौकशी करण्यासाठी, हिशेब तपासण्यासाठी किंवा समायोजित करण्यासाठी आणि वाटणी करण्यासाठी, या चार उद्देशांसाठी, विहित केलेल्या अटी आणि मर्यादांच्या अधीन राहून आयोगपत्र जारी करण्याच शक्ति प्रदान करत. आदेश २६ मध्ये आयोगपत्रे जारी करण्यासाठी आणि संलग्न प्रकरणांशी संबंधित नियम नमूद केले आहेत. अपीलकर्त्याचे विद्वान वकील श्री. चॅटर्जी यांनी असे सादर निवेदन केले की न्यायालयाचे अधिकार संहितेच्या चार कोपऱ्यांमध्ये शोधले गेले पाहिजेत आणि जेव्हा संहिता कलम ७५ मध्ये आयोगपत्राच्या विषय स्पष्टपणे हाताळला आहे तेव्हा न्यायालय कलम १५१ अन्वये आपल्या अंगभूत शक्तींचा वापर करू शकत नाही आणि त्याद्वारे त्याच्या शक्तींमध्ये भर पडते. दुसरीकडे, राज्यासाठी असे सादर केले जाते की, संहिता सर्वसमावेशक नाही आणि न्यायालय, त्याच्या अंगभूत शक्तींचा वापर करून, संहितेद्वारे प्रतिबंधित नसलेली कोणतीही प्रक्रिया स्पष्टपणे किंवा आवश्यक अर्थाने स्वीकारू शकते, जर न्यायालयाला न्यायाच्या **उदिष्टा साठी** किंवा न्यायालयाच्या कार्यवाहीचा दुरुपयोग टाळण्याकरिता न्यायालयाला आवश्यक वाटली तर.

कलम १५१ खालीलप्रमाणे वाचावे :

"या संहितेतील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायाची उदिष्टे साध्य करण्याकरिता किंवा न्यायालयांनच्या कार्यवाहीचा दुरुपयोग टाळण्याकरिता आवश्यक असतील् ते आदेश काढण्याच्या न्यायालयाच्या अंगभूत शक्ति मर्यादित होतात किंवा त्यावर अन्यथा परिणाम होतो असे मानण्यात येणार नाही."

न्यायालयाच्या अंगभूत शक्ती संहितेने न्यायालयाला विशेषतः दिलेल्या अधिकारांव्यतिरिक्त आहेत. ते त्या अधिकारांना पूरक आहेत आणि म्हणूनच असे मानले पाहिजे की, जेव्हा त्या अधिकारांचा वापर कोणत्याही प्रकारे संहितेत स्पष्टपणे दिलेल्या तरतुदीं विरुद्ध किंवा विधीमंडळाच्या हेतूंच्या विरूद्ध नसतो तेव्हा न्यायालय संहितेच्या कलम १५१ मध्ये नमूद केलेल्या उद्देशांसाठी त्यांचा वापर करण्यास मोकळे आहे. संहितेत स्पष्टपणे केलेल्या कार्यपद्धतीच्या विरुद्ध किंवा त्यापेक्षा भिन्न अशा प्रकारे अंगभूत शक्तीचा वापर केला जाऊ नये, हे ही सर्वश्रुत आहे.

वादीची लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी श्री. रघुबीर परशाद, आयुक्त यांची नेमणूक करण्याचा अतिरिक्त मुन्सिफ यांचा आक्षेपित आदेश न्यायालयाने आपल्या अंगभूत शक्तींचा वापर करून दिलेल्या आदेशावर आहे असे म्हणता येईल का, हा निर्धाराचा प्रश्न आहे. संहितेच्या कलम १५१ च्या व्यतिरिक्त अंगभूत शक्ती या न्यायालयासमोरील कारण निश्चित करताना अवलंबिल्या जाणाऱ्या कार्यपद्धती संदर्भात आहेत. हे अधिकार कोणत्याही पक्षकाराकडे असलेल्या मूलभूत अधिकारांवरील अधिकार नाहीत. एखाद्या पक्षकाराच्या अशा अधिकारांवर परिणाम होईल असे आदेश देण्यासाठी न्यायालयांना विशिष्ट अधिकार प्रदान करावे लागतील. असे अधिकार कार्यपद्धतीच्या बाबतीत न्यायालयाच्या अंगभूत शक्तींचा कक्षेत येऊ शकत नाहीत, जे अधिकार न्यायालयात त्यांचे स्त्रोत

आहेत आणि त्याच्या प्रथेचे आणि कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी सर्व आवश्यक अधिकार धारण करतात. पक्षकाराला त्याच्या लेखा पुस्तकांवर पूर्ण अधिकार असतो. न्यायालयाला त्याची मालमत्ता जबरदस्तीने जप्त करण्याची कोणतीही अंगभूत शक्ती नाही. त े तस े करत असल्यास, ते पक्षकाराच्या खाजगी अधिकारांवर आक्रमण करते. महत्वाची कागदपत्रे किंवा पुस्तके पुरावा म्हणून वापरण्याच्या उद्देशाने कोर्टात मिळवण्यासाठी संहितेत विशिष्ट प्रक्रिया नमूद केली आहे . पक्षकार आपल्या प्रकरणाच्या समर्थनार्थ अशी कागदपत्रे किंवा पुस्तके महत्वाची म्हणून सादर करण्यास मोकळा आहे. एखादा पक्षकार न्यायालयात अशी कागदपत्रे दुसऱ्या पक्षाने न्यायालयात सादर करण्यासाठी न्यायालयाची मदत मागू शकते की ती पुराव्यासाठी वापरली जाऊ इच्छित असेल आणि त्या पक्षकाराने ती आपल्या ताब्यात असल्याचे मान्य केले असेल. एखाद्या पक्षकाराने कागदपत्रे सादर केली नाहीत, जी त्याला कायदेशीररित्या सादर करण्यास सांगितले गेले आहेत, तर संहितेच्या तरतुदींनुसार न्यायालयाला त्या पक्षकाराला दंड करण्याचा अधिकार आहे. विशेषत: न्यायालयाकडून कागदपत्रे सादर करण्यासाठी पक्षकराला बजावल्यानंतर, आपल्या ताब्यातील संबंधित दस्तऐवज सादर न करणाऱ्या अशा पक्षाविरुद्ध कोणतेही अनुमान काढण्याचा अतिरिक्त अधिकार न्यायालयाला आहे. ज्या प्रकरणांमध्ये न्यायालयाने पक्षकाराकडून दस्तऐवज मागवला आहे, अशा प्रकरणांमध्येही न्यायालयाला कसूररदार पक्षकाराच्या ताब्यातून दस्तऐवज बळजबरीने ताब्यात घेण्याचा अधिकार मिळालेला नाही.

या लेखा पुस्तकांवर प्रतिवादींनचा कोणताही अधिकार नव्हता. त्यांना त्यांच्यावर कोणताही दावा करता आला नाही. त्यांनी ही पुस्तके जप्त करण्यासाठी अर्ज केला कारण त्यांना भीती वाटत होती की वादी त्या लेखा पुस्तकांमध्ये अशा नोंदी करू शकतात ज्यामुळे ते न्यायालयात दाखल

करत असलेल्या प्रकरणाच्या विरोधात जाऊ शकतात. प्रतिवादींची विनंती खरोखरच न्यायालयाच्या कागदोपत्री पुरावे गोळा करण्यासारखी होती जी प्रतिवादींनी त्यावेळी त्यांच्या बाजूने असल्याचे मानले. एखाद्या पक्षकारासाठी पुरावे गोळा करणे किंवा त्या लेखा पुस्तकांमध्ये बनावट नोंदी केल्यामुळे होणाऱ्या दुष्परिणामांपासून प्रतिस्पर्धी पक्षकाराचे रक्षण करणे, हे न्यायालयाचे काम नाही. जर वादीने बनावट नोंदी केल्या आणि खटल्यात बनावट नोंदी पुरावे म्हणून वापरल्या तर, प्रतिवादीला त्या नोंदींवर विवाद करण्याची आणि त्या बनावट आहेत हे सिद्ध करण्याची पुरेशी संधी असेल.

त्यामुळे वादींनची लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्त नेमण्याचा आदेश पारित करण्याची अंगभूत शक्ती अतिरिक्त मुन्सिफ यांना नव्हती, असे आमचे मत आहे. त्यामुळे श्री. रघुबीर परशाद यांची आयुक्त म्हणून या उद्देशासाठी नियुक्ती करणारा आदेश हा अधिकारितेशिवाय पारित केलेला आदेश होता आणि त्यामुळे तो रद्दबातल आदेश होता.

सरकारकरीता विद्वान वकील श्री. माथूर यांनी पर्यायी असे सादर केले आहे की, अतिरिक्त मुन्सिफ यांनी अवलंबलेली आक्षेपित प्रक्रिया संहितेच्या काही तरतुदींमध्ये येते आणि संहितेचा आदेश ३८ चा नियम ५ आदेश ३९ चे नियम १ (बी) आणि ७ आणि आदेश ४० चा नियम १ संदर्भित केले आहेत. आम्ही या विवादाशी सहमत नाही. यापैकी कोणत्याही तरतुदींनुसार आक्षेपित आदेश पारित करण्यात आलेला नाही. हा स्पष्टपणे अतिरिक्त मुन्सिफ यांनी न्यायालयाच्या अंगभूत शक्ति चा वापर करून पारित करणे अभिप्रेत होते असा आदेश होता. आदेश खालीलप्रमाणे होता:

"हे असाधारण आहे की या प्रकारचा अर्ज २ वर्षांनंतर या शेवटच्या टप्प्यावर आला आहे. तथापि, न्यायाच्या हितासाठी, श्री रघुबीर पर्शाद यांना आयोगपत्र जारी करा. त्यांनी जाऊन १९५१

वर्षासाठी वादी कडून वही खाते मिळवावे आणि न्यायालयात हजर करावे. फी रु. २०, अधिक प्र. भ. सहा दिवसात अहवाल. आयोगपत्राच्या खर्चावर कर आकारला जाणार नाही."

पुढे असे की, आदेश ३८ चा नियम ५ मधील तरतूदी या पारित होणारा हुकूमनामा विफल ठरू नये याला प्रतिबंध करतात आणि जेथे प्रतिवादी धनकोनची फसवणूक करण्यासाठी त्याच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची धमकी देतो तेथे आदेश ३९ चा नियम १ लागू होतो. यापैकी कोणतीही तरतूद सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीला लागू होत नाही. आदेश ३९ चा नियम ७ न्यायालयाला, एखाद्या दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावरून, अशा दाव्याची विषयवस्तू असलेली किंवा त्या दाव्यात तिच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित होईल अशी कोणतीही मालमत्ता अटकावून ठेवणे, तिचे जतन करणे किंवा पाहणी करणे इत्यादींसाठी आदेश देण्यासाठी शक्ती प्रदान करत. वादींची लेखा पुस्तके 'मालमत्ता' नव्हती जी खटल्याचा विषयवस्तू होती किंवा त्यांच्याबद्दल खटल्यात प्रश्न निर्माण होऊ शकेल असे नव्हते.. जर वादी किंवा प्रतिवादीने लेखा पुस्तकांवर अवलंबून राहण्याची तयारी दाखवली असती तर ती लक्षणीय साक्षीपुरावा हा ठरू शकली असती . त्यामुळे आमचे असे म्हणणे आहे की, वादीची लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक करण्याचा अधिकार अतिरिक्त मुंसिफ यांना संहितेनुसार नाही.

शेवटी सरकारच्या वतीने विनंती करण्यात आली की, अतिरिक्त मुन्सिफ यांना वादींनची लेखा पुस्तके जप्त करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक करण्याचा अधिकार नव्हता आणि म्हणून जरी श्री. रघुबीर परशाद यांची आयुक्त म्हणून केलेली नियुक्ती रद्दबातल होती तरी दंड संहितेच्या कलम २१ चे स्पष्टीकरण २ अन्वये श्री. रघुबीर परशाद यांना लोक सेवक मानले जावे. श्री रघुबीर परशाद यांची आयुक्तपदी नियुक्ती वैध असती तर भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या चौथा खंड नुसार

ते लोक सेवक असते, हा अपीलकर्त्यासाठी वादाचा मुद्दा नव्हता. कलम २१ चे स्पष्टीकरण २ खालीलप्रमाणे वाचावे :

"'लोकसेवक' हा शब्द जिथे जिथे येतो तेथे तेथे तो, लोकसेवकाचे स्थान प्रत्यक्षात धारण करत असलेल्या प्रत्येक व्यक्तीला अनुलक्षून असल्याचे समजण्यात येईल, मग ते स्थान धारण करण्याच्या तिच्या हक्कात काहीही कायदेविषयक उणीव असो."

सरकारतर्फे युक्तिवाद असा आहे की, अतिरिक्त मुन्सिफ यांना वादींची लेखा पुस्तके जप्त करण्याच्या हेतूने आयुक्तांची नेमणूक करण्याचा अधिकार नसल्यामुळे, श्री रघुबीर परशाद यांची आयुक्तपदी नेमणुक हा कायदेशीर दोष होता, तरी त्याचा त्यांच्या लोकसेवक असण्यावर परिणाम होणार नाही, कारण लोकसेवकाचे स्थान ते प्रत्यक्षात धारण करत होते. आम्ही या युक्तिवादाशी सहमत नाही आणि आमचे असे मत आहे की, हे स्पष्टीकरण तेव्हाच लागू होते जेव्हा पद अस्तित्वात असेल. जेव्हा पूर्वीपासून कोणतेही पद अस्तितवात नाही किंवा जेव्हा नियुक्त केलेल्या व्यक्तीला नियुक्त करण्याचा अधिकार नसतो तेव्हा स्पष्टीकरण लागू होत नाही.

वेबस्टरच्या न्यू इंटरनॅशनल डिक्शनरी ऑफ दि इंग्लिश लैंग्वेज नुसार 'परिस्थिती' या शब्दाचा अर्थ असा आहे : नोकरीचे पद किंवा ठिकाण, ठिकाण, कार्यालय ; दुकानाच्या परिस्थितीत. या स्पष्टीकरणाच्या हेतूसाठी विपरीत अर्थ 'कार्यालय' असेल. त्याच शब्दकोशानुसार पुन्हा 'कार्यालय' म्हणजे शासकीय प्राधिकाऱ्याने शक्तीनुसार प्रदान केलेले विशेष कर्तव्य, विश्वास, भार किंवा पद आणि सार्वजनिक उद्देशाकरिता ; शासकीय शक्तीच्या कृतीने प्रदान केलेले विश्वासाचे किंवा प्राधिकाराचे पद, सार्वजनिक कार्य किंवा नोकरी करण्याचा अधिकार आणि कार्यकारी अधिकारी किंवा न्याय कार्यालय म्हणून आणि त्यास लागू असलेले वित्तलब्धी असलेले (जर असल्यास) ते प्राप्त

करते........ व्यापक अर्थाने शासकीय नोकरीतील कोणतेही पद किंवा स्थान विशेषतः विश्वास किंवा अधिकार. शब्दकोशात पुढे कार्यालय, पद, नियुक्ती, परिस्थिती आणि ठिकाण या शब्दांच्या अर्थातील फरक नमूद करते आणि म्हणते : कार्यालय सामान्यतः (विशेषतः सार्वजनिक) विश्वासाचे किंवा अधिकाराचे पद सुचवते ; आणि परिस्थिती नोकरीची कल्पना, विशेषतः दुय्यम पदा संदर्भात घरातील खाजगी शिक्षिका, खाजगी सचिव म्हणून.

म्हणून हे स्पष्ट आहे की, हे स्पष्टीकरण लागू करण्यासाठी संबंधित व्यक्ती पूर्वीपासून अस्तित्वात असलेले लोकसेवकाचे पद प्रत्यक्षात धारण करत असली पाहिजे. जर कार्यालय किंवा पद नसेल तर कोणत्याही व्यक्तीला ते प्रत्यक्षपणे धारण करण्याचा प्रश्न उद्भवू शकत नाही आणि संबंधित व्यक्ती त्या स्पष्टीकरणाच्या अटीच्या आत येण्याचा प्रश्नच उद्भवू शकणार नाही. आयुक्तांचे कोणतेही पद किंवा कार्यालय अस्तित्वात नव्हते. इथे जे काही घडले ते असे की श्री. रघुबीर परशाद यांना काही कागदपत्रे जप्त करून आपल्या ताब्यात ठेवण्याचा अधिकार देण्यात आला होता. प्रस्तुत प्रकरणात आयुक्तांचे कोणतेही पद अस्तित्वात नव्हते, तसेच वादींची लेखा पुस्तके जप्त करण्याच्या हेतूने श्री रघुबीर पर्शाद यांची आयुक्तपदी नेमणूक करण्याचा अधिकार अतिरिक्त मुन्सिफ यांना नव्हता आणि त्यामुळे श्री. रघुबीर परशाद यांची आयुक्तपदी नेमणूक करण्यास हे स्पष्टीकरण लागू होत नाही. त्यामुळे श्री. रघुबीर परशाद यांना लोकसेवक मानता येणार नाही.

म्हणूनच आम्ही अपीलकर्त्यांचा युक्तिवाद मान्य करतो आणि असे मानतो की श्री. रघुबीर परशाद हे लोकसेवक नाहीत आणि म्हणूनच अपीलकर्त्यांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या लेखा पुस्तकांशी अनधिकृतपणे छेडछाड करण्याची संधी मिळावी म्हणून त्यांना पैसे देऊन भारतीय दंड संहितेच्या कलम १६५ ए अंतर्गत कोणताही गुन्हा केला नाही. म्हणून आम्ही खालील न्यायालयाचा

आदेश रद्द ठरवून अपील मंजूर करतो आणि अपीलकर्त्यांना कलम १६५ -अ अन्वये गुन्ह्यातून दोषमुक्त करतो आणि दंड भरलेला असल्यास, तो परत करण्याचे निर्देश देत आहोत. अपीलकर्ते जामिनावर आहेत आणि तरी त्यांचे जामीनपत्र रद्द होईल.

अपील मंजूर .

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x